समाज परिवर्तनासाठी
नेतृत्व विकसन

# युवोन्मेष

सौर श्रावण शके १९४३

**‘नेतृत्व’ विषयाला वाहिलेले युवागटासाठीचे प्रायोगिक अंक!**

नेतृत्व संवर्धन केंद्र, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ३०

## राष्ट्रीय एकात्मता विशेषांक

भाग - १



# अंतरंग...

## भाग १, २, व ३ मधील सामायिक लेख


संवाद .................................. १
हितगुज .................................. ३

### भाग १

- **लेख**
  - ✻ हार्मनी अर्थात संवादिता!! ............... ५
  - ✻ Gyansetu Visit to Jammu ............... ११
- **QR Codes**
  - ✻ ब्रिगेडियर अभय भट यांचा संदेश ............. १०
  - ✻ **Listen and Answer: Gyan Setu Katta** (Arunachal Pradesh) ........................ १४

### भाग २

- **लेख**
  - ✻ National Integration A Citizen's Perspective
  - ✻ ज्ञानसेतूच्या माध्यमातून प्रवास करताना...
- **QR Codes**
  - ✻ भारतीय लष्कर प्रमुख जनरल मनोज नरवणे यांचा संदेश
  - ✻ **Listen and Answer: Gyan Setu Katta** (Madhya Pradesh)

### भाग ३

- **लेख**
  - ✻ **Education - The Pathway to Leadership and National Integration**
  - ✻ ईशान्य भारतातील एक वर्ष...
- **QR Codes**
  - ✻ Video of Lt. Gen. S. S. Hasabnis (Retd.)
  - ✻ **Listen and Answer: Gyan Setu Katta** (Meghalaya)



तुमच्या प्रतिसादाच्या प्रतिक्षेत...
संपर्क – नेतृत्व संवर्धन केंद्र, ज्ञान प्रबोधिनी, पुणे.
दूरभाष – ०२०–२४२०७१७९
yuvonmesh@gmail.com
WhatsApp No. – ९६३७३१७०६१



| संपादक | अतिथी कार्यकारी संपादक | अक्षरजुळणी |
|---|---|---|
| महेन्द्र सेठिया | पूर्वा दीक्षित–धोकटे | सुप्रिया कुलकर्णी |

प्रकाशन दिनांक: सौर २४ श्रावण शके १९४३/१५ ऑगस्ट२०२१

# संवाद

नमस्कार मित्र-मैत्रिणींनो,

युवोन्मेष च्या माध्यमातून तुमच्याशी बोलायची संधी मिळाल्याचा आनंद वाटतो आहे. युवोन्मेषचा हा राष्ट्रीय एकात्मता विशेषांक आहे आणि हा अंक भारताच्या ७५ व्या स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने प्रकाशित होतो आहे याबद्दल विशेष आनंद वाटतो आहे!

स्वातंत्र्याच्या या अमृत महोत्सवी वर्षात आपण एका बाजूला आपल्या इतिहासाकडे बघून शिकायचे तर दुसरीकडे त्यातील चांगल्या-वाईट परंपरा समजून घेत भविष्याचा वेध घ्यायचा! या दोन्ही प्रक्रिया एकत्र करत असताना, 'आपण नक्की कोण? आपली संस्कृती, आपला समाज आणि त्यातल्या विचारधारा कोणत्या?' याचा शोध घेणे क्रमप्राप्त आहेच, पण त्यासोबतच आधुनिक जगतातील  समाजरचना, विज्ञान-तंत्रज्ञानातील प्रगती, पर्यावरणीय बदल यांचा अभ्यासही आपल्याला करावा लागेल. या दोन्हीच्या अभ्यासातून पुढच्या काळात राष्ट्रीय एकात्मतेसाठी पूरक, पोषक घटक कोणते हे आपल्याला सापडेल. असे घटक शोधणे, त्यावर कामाला सुरुवात करणे आणि अशा कामासाठी गट उभा करणे म्हणजे राष्ट्रीय एकात्मतेसाठी नेतृत्व करणे.

अशा नेतृत्वाचे एक उदाहरण म्हणून ज्ञान प्रबोधिनी मध्ये २०१३ पासून ज्ञानसेतू हा प्रकल्प सुरू आहे. या प्रकल्पातून विज्ञानाचे माध्यम वापरून राष्ट्रीय एकात्मतेसाठी संपर्काचे काम नित्य चालू आहे. यातून आपण आत्तापर्यंत ८ राज्यांमध्ये ५५० कार्यकर्त्यांच्या मदतीने १०९० कार्यशाळांच्या माध्यमातून ५५००० विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवीत आहोत.

त्यामुळेच या अंकाच्या संपादनाची जबाबदारी ज्ञानसेतूच्या गटाने घेतली. त्यातून ज्ञानसेतू गटाचे अनुभव, शिकलेल्या गोष्टी आपल्या सर्वांपर्यंत पोहोचवत आहोत.

ज्ञानसेतूच्या दौऱ्यांमध्ये सहभागी कार्यकर्त्यांचे अनुभव नक्की कसे होते, ते काय काय शिकले, त्यांनी या अनुभवांकडे कसे पाहिले या संदर्भातले प्रातिनिधिक लेख तुम्हाला या अंकामध्ये वाचायला मिळणार आहेत आणि मला आशा आहे हे लेख वाचून, 'असे अनुभव आपण घेतले पाहिजेत' असे वाटेल. या सगळ्या कामामागची भूमिका समजून घेतली तर असे काम करण्याची प्रेरणा वाढत जाते असा माझा अनुभव आहे. मा. प्रशांत दिवेकर (भाग १ मध्ये) व मा. एअर वाईस मार्शल (निवृत्त) किरण पळसुले (भाग २ मध्ये) यांच्या लेखांमधून

सुद्धा भूमिका स्पष्ट व्हायला नक्की मदत होईल.

१०–१५ दिवस जाऊन कार्यशाळा घेतानाचे अविस्मरणीय अनुभव ठरवून वर्षभर मणिपूर सारख्या राज्यात जाऊन राहाणं तिथे काम करणं हा साहसी अनुभव देखील तुम्हाला वाचायला मिळेल.

राष्ट्रीय एकात्मतेविषयी प्रबोधिनीच्या भूमिकेतील काही पैलू या अंकातील विविध भागातील चौकटींमध्ये तुम्हाला वाचायला मिळतील, विचार करायला उद्युक्त करतील.

या अंकाचे अजून एक वैशिष्ट्य मला आवर्जून सांगावेसे वाटते ते म्हणजे तर लेखांबरोबर दिलेल्या लिंक्सच्या माध्यमातून ऐकण्यासाठी व पाहण्यासाठी साहित्य उपलब्ध करून देत आहोत. ही मेजवानी आपल्याला मिळावी यासाठी हे आपलाच ज्ञानसेतूचा कार्यकर्ता आशुतोष भुजबळ याने विशेष प्रयत्न घेतले त्याचे मी आभार मानते.

गेलं वर्षभर चालू असणाऱ्या 'ज्ञानसेतू कट्टा' मालिके मधील "Know our country" या उपक्रमांमधल्या वेगवेगळ्या राज्यातील स्थानिक कार्यकर्त्यांच्या मुलाखती, तिथले प्रश्न, अनुभव समजून घेऊया. ते ऐकून त्याच्या खाली दिलेली प्रश्नावली नक्की सोडवा.

हा अंक एकूण तीन भागांमध्ये १५, २२ आणि २९ ऑगस्ट या तारखांना आपल्यापर्यंत पोहोचणार आहे. या 'युवोन्मेष'च्या अंक निर्मितीच्या प्रवासात माझा या विषयावर बराच अभ्यास झाला, चर्चा झाल्या. त्यासाठी मला सौगंधदादा आणि आशुतोषदादा बारमुख यांचे विशेष आभार मानावेसे वाटतात. या प्रयत्नाबद्दल तुमचे अभिप्राय आणि प्रतिक्रिया समजून घ्यायला नक्की आवडतील.

**तुमचीच,**
**पूर्वाताई**
(gyansetu@jnanaprabodhini.org)
९८८१७६१४८८

ज्ञान-सेतु
Connecting through knowledge exchange
A Project by Jnana Prabodhini

**ज्ञानसेतू या उपक्रमाबद्दल अधिक माहितीसाठी शेजारील लिंकवर क्लिक करा आणि व्हिडीओ पाहा.**

## हितगुज

प्रिय युवा प्रबोधकांनो,

येत्या वर्षात 'युवोन्मेष'चे ५ अंक प्रकाशित करण्याचा संकल्प आपण केला आहे. त्यातील पहिला, 'राष्ट्रीय एकात्मता विशेषांक' तुमच्यापर्यंत पोहोचवताना आनंद होत आहे. नेतृत्व संवर्धन केंद्रातील आजी-माजी विद्यार्थी व ज्ञान प्रबोधिनीच्या युवाशक्ती प्रबोधन कार्यदिशेतील युवक-युवतींचे गट यांच्या संयुक्त प्रयत्नातून यावर्षीचे अंक प्रकाशित होणार आहेत याचाही विशेष आनंद होतोय.

स्थानिक स्तरापासून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर नेतृत्व करण्यासाठी समजून घेण्याचा, अनुभवण्याचा, विचार करून कृती करण्याचा एक अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे 'राष्ट्रीय एकात्मता' आहे असं मला वाटतं.

आपल्या देशाचा इतिहास, भूगोल, तेथील माणसं, त्यांची जीवनशैली, त्यांची संस्कृती, त्यांचे पिढीजात शहाणपण, त्यांचे प्रश्न यांचा परिचय करून घेणं, त्याविषयी आपल्या मनामध्ये आस्था निर्माण होणं, त्याविषयी आपलेपणा, आपुलकी वाटणं ही राष्ट्रीय एकात्मतेसाठीची पहिली पायरी आहे असं मला वाटतं.

त्यासाठी मातृभूमी परिचय सहली, देशाच्या विविध भागांमध्ये अभ्यास सहली व अभ्यासदौरे, मैत्री अभियाने, नैसर्गिक आपत्तीच्या वेळी मदतकार्ये, ज्ञानसेतू सारखे प्रकल्प यांमध्ये सहभागी होणं, भारतातल्या विविध भागांमधील व्यक्तींशी संवाद-मैत्री वाढणं, तेथील लोकसंस्कृतीचा आस्वाद घेणं, तेथील भाषा समजून घेण्याचा, शिकण्याचा प्रयत्न करणं, तेथील कर्तृत्ववान व्यक्ती, संस्था, संघटना, चळवळी यांचा अभ्यास करणं इ. गोष्टी करता येतील. भारतामधील विविधतेतील एकता शोधण्यापेक्षा, एकतेची विविध रूपे कशी आहेत हे पाहात गेलो की अनेक गोष्टी आपल्याला, आपल्याशी जोडणाऱ्या वाटायला लागतील. त्यासाठी मुद्दाम वेगळे प्रयत्न करावे लागणार नाहीत.

यापुढची पायरी अर्थातच एकात्मतेला पुष्टी देणाऱ्या व छेद देणाऱ्या घटकांचा अभ्यास करणं. त्यासाठी भारताच्या विविध भागातील प्राचीन व अर्वाचीन इतिहासापासून वर्तमानाचा व भविष्यकालीन इच्छा-आकांक्षा, स्वप्न-समस्या यांचाही अभ्यास करावा लागेल. त्यातून मोठ्या प्रमाणावर जनजागृती करावी लागेल. विविध विचारांमधील समान धागे जोडत जावं लागेल.

विविध प्रकारची विषमता ही या एकात्मतेला छेद देणारी

महत्त्वाची गोष्ट आहे असं मला वाटतं. मग ती शिक्षणातली असो की संधींची असो किंवा रोजगाराशी, आर्थिक सुबत्तेशी निगडित असो किंवा भौतिक विकास, जीवनमान यांच्याशी संबंधित असो. ही विषमता समजून घेणं, त्यामागील कारणांचा अभ्यास करून ती दूर करण्यासाठी कृती कार्यक्रम योजणं, दीर्घकालीन–सातत्यपूर्ण, कल्पक संघटित प्रयत्नांची त्याला जोड देणं, असे प्रयत्न करणाऱ्या विविध संस्था–संघटनांमध्ये समन्वयाची भूमिका घेणं हेही आपल्याला करायला हवं आहे.

शिक्षण चालू असतानाच यासाठी ठरवून वेळ काढणं आणि शिक्षणानंतर काही महिने, वर्षं या कामासाठी वेळ देण्याचा संकल्प करणं अशी सुरुवात करता येईल. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षामध्ये या प्रक्रियेला वेग यावा यासाठी युवोन्मेषचा हा 'राष्ट्रीय एकात्मता विशेषांक' नक्कीच बळ देईल, विचारांना दिशा देईल आणि कृतीरूप प्रतिसाद देण्याची प्रेरणा देईल असा मला विश्वास वाटतो.

ज्ञानसेतू प्रकल्पाच्या प्रमुख पूर्वाताई, प्रकल्पातील कार्यकर्ता आशुतोष भुजबळ व नेतृत्व संवर्धन केंद्रातील सौगंधदादा यांच्या पुढाकारातून हा अंक साकार होतोय त्याबद्दल त्यांचे विशेष कौतुक! सर्व लेखकांना मनापासून धन्यवाद.

क्रमश: तीन टप्प्यात ई–माध्यमातून तुमच्यापर्यंत पोहोचणाऱ्या युवोन्मेषेच्या 'राष्ट्रीय एकात्मता विशेषांका'चे तुम्ही डोळसपणे वाचन कराल व त्यावर विचार, कृतीतून प्रतिसाद द्याल असा विश्वास वाटतो.

'रूप पालटू देशाचे' या कार्यात आपण सगळेच सहभागी होऊ या! अनेकानेक शुभेच्छांसह....

**सस्नेह तुमचा,**



**महेन्द्र सेठिया**

# हार्मनी अर्थात संवादिता!!



**राष्ट्रीय एकात्मतेसाठी काम करणे म्हणजे संवादिनीचे काम करणे. जेथे विसंवाद आहे तेथे संवाद निर्माण करणे आणि जेथे सुसंवाद आहे तेथे एकतानता निर्माण करणे. अशी एकतानता निर्माण झाली तरच समाजात राष्ट्रीय एकात्मतेचा भाव रुजेल.**

जून महिन्याच्या अखेरीला बरेच दिवसांची प्रतीक्षा असलेल्या एका पुस्तकाची छपाई पूर्ण झाली. पुस्तकाचा विषयच वेगळा आहे 'अरुणाचल प्रदेशामधील विविध जनजातींच्या पारंपरिक वस्त्रांच्या वीणकामातील भौमितिक आकारांचे संकलन'. अरुणाचल प्रदेशातील विविध जनजाती आजही स्वयंपूर्णतेने आपली पारंपरिक वस्त्रे घरच्या हातमागावरच विणतात. अतिशय आकर्षक रंग आणि वैशिष्ट्यपूर्ण डिझाईन असलेले कोट, गाले (महिला लुंगीसारखे गुंडाळतात असे वस्त्र) विणले जातात. प्रत्येक जनजातीची डिझाईन वैशिष्ट्यपूर्ण असतात. डिझाईनवरून व्यक्ती कोणत्या जनजातीची आहे हे ओळखता येऊ शकते. या डिझाईनमध्ये वेगवेगळे भौमितिक आकार वापरले जातात. चौकोन (डायमंड), त्रिकोण, कोन, रेषा, बिंदू यांचा वापर करून वेगवेगळ्या संगती आणि रचना कशा तयार केल्या जातात अशा डिझाईनचे संकलन या पुस्तकात केले आहे. अरुणाचल प्रदेशात रिवॉच (RIWATCH) या संशोधन संस्थेचे श्री. विजय स्वामी आणि त्यांचे सहकारी यांनी हे संकलन केले आहे. या पुस्तकाचे नाव ठेवण्याची चर्चा सुरू असताना विजयजींनी 'हार्मनी इन टेक्स्टाईल' हे नाव निश्चित केले. पुस्तकाचा विषय भौमितिक आकारांचे संकलन म्हणजे खरंतर चौकोनी विषय

आणि या विषयाच्या शीर्षकासाठी हार्मनी असा नादवाचक शब्द का योजला असेल ? बरेच दिवस माझ्या मनात हा प्रश्न घोळत होता.

शब्दशः हार्मनी म्हणजे संवादिता, सहचार, एकतान.

ज्यातून अविरोध, संगम, ऐक्य, अर्थैकत्व प्रतीत होते.

आणि या पुस्तकात असा कोणता संवाद घडतो ? ....

तीन वर्षांपूर्वी अहमदाबाद मधील कॅलिको संग्रहालयाला दिलेली भेट आठवली. संग्रहालयात कापडावरील कलमकारी, कच्छी, पाटण पटोला, बाटिक यांसारख्या विविध प्रकारांचे विणकाम आणि भरतकाम यांचे असंख्य नमुने होते. चित्रकला असो वा भरतकाम असो वा विणकाम असो प्रत्येक कलाकृतीतून कलाकाराची साधना व्यक्त होत होती. धागे गुंफताना कलाकाराकडे माध्यमावरील प्रभुत्व, कल्पकता आणि उच्च अभिव्यक्तीसाठीची उत्कट साधना या तीन गोष्टी असतात. त्यांची पेड जेव्हा जमून येते तेव्हाच कलाकार अशी कलाकृती निर्माण करू शकतात. धागा तोच असला, हातमाग तोच असला आणि कलाकारही तोच असला तरी; जेव्हा धागा, हातमाग आणि कलाकार या तिन्हींमध्ये योग्य समन्वय साधला जातो; म्हणजे ते एका सुरात एकमेकांशी संवाद साधतात; म्हणजेच त्यांच्यात एकतानता अर्थात हार्मनी निर्माण होते तेव्हाच अशी कलाकृती निर्माण होते. अरुणाचलात तर वस्त्र निर्मितीचे लोकजीवनाशी घट्ट नाते आहे. त्यामुळे 'हार्मनी इन टेक्स्टाईल' हे शीर्षक फारच भावले...

अशी हार्मनी अर्थात संवादिता आपल्या आयुष्यात फार महत्त्वाची आहे आणि आपल्या आयुष्याला व्यापून राहिलेली आहे.

२००५ मध्ये नागालँड मधील मेसुलूमी गावी गेलो होतो. म्यानमारच्या सीमेलगत पर्वतरांगांमध्ये हे गाव वसलेले आहे.



एक दिवस रात्री गावकऱ्यांनी फिरायला येता का विचारले. ते त्यांच्या शेतीच्या कामासाठी बाहेर चालले होते. त्यांच्याबरोबर डोंगर उतरून नदीच्याकडेला आलो. थोड्या वेळाने त्यांनी नदीच्या दुसऱ्या बाजूच्या डोंगरउतारावरील जंगल पेटवून दिले. हाहा म्हणता आग जंगलात पसरली. नागालँडमध्ये 'झूम' शेती करतात, असे भूगोलाच्या पुस्तकात वाचले होते. परीक्षेसाठी मुलांकडून त्याचा अभ्यास देखील करून घेतला होता; पण पहिल्यांदाच या प्रकारच्या शेतीची तयारी कशी करतात ते पाहात होतो. साहजिकच मनात पर्यावरणाच्या या ऱ्हासाबद्दल अनेक प्रश्न, काळजीचे विचार आले. दुसऱ्या दिवशी गावकऱ्यांबरोबर याबद्दल बोलत होतो. असे जंगल नष्ट करून कसे चालेल याबद्दल विचारत होतो. तेव्हा एक जाणता माणूस म्हणाला झूम शेतीने जंगल नष्ट होत नाही. आमच्या पारंपरिक पद्धतीमध्ये गावरानाचे  बारा भाग केलेले आहेत. एका भागातील जंगल जाळून शेतीसाठी जमीन तयार केली जाते. त्या जमिनीत पाच-सहा वर्षं पीक घेता येते. एकदा जमिनीचा कस कमी झाला की ती जागा मोकळी सोडली जाते आणि शेती नवीन जागी स्थलांतरित होते. काही वर्षांत त्या जागी परत वनस्पतींची वाढ होते. ती जागा परत शेतीसाठी वापरेपर्यंत तेथे रान माजते. अशा तऱ्हेने गावाचे शेतीचे क्षेत्र आणि वन क्षेत्र संतुलित राहते. गप्पांच्या शेवटी त्याने जंगलांच्या ऱ्हासासाठी आधुनिक जीवनशैली आणि अर्थव्यवस्थेलाच कारणीभूत ठरवले आणि ते बऱ्याच अंशी खरे देखील आहे. पारंपरिक संकेतानुसार, श्रद्धांनुसार जीवन जगणारा हा आदिवासी समाज निसर्गाशी हार्मनी राखत जीवन जगत असतो. शिकार केल्यावर काय करायचे आणि काय नाही करायचे याबद्दलचे या समाजातील टॅबूज् (सामाजिक संकेत )समाजाला निसर्गाबरोबर सुसंवाद साधत संतुलित जीवन जगायला शिकवतात....

संतुलनासाठी एखाद्या प्रणालीच्या घटकांमध्ये  सुसंवाद असणे महत्त्वाचे आहे. मग ते निसर्गातील जैविक; अजैविक घटक असोत वा मानवी शरीरातील पेशी असोत. हे संतुलन जेव्हा बिघडते, विसंवाद निर्माण होतो तेव्हा असंतुलन निर्माण होते आणि ते असंतुलन प्रदूषणाच्या रूपाने निसर्गात तर कर्करोगाच्या रूपाने मानवी शरीरात प्रकट होते.

आपण प्रबोधिनीमध्ये उपासनेच्या वेळी पेटीची साथ घेतो. पेटीला इंग्लिशमध्ये हार्मोनियम तर मराठीत संवादिनी म्हणतात.



(संवादिनी सारखा छान शब्द असताना या वाद्याला पेटी म्हणणे अगदीच गद्य आहे.) संवादिनी गायकाला स्वतःच्या सुरांशी संवाद साधण्यास मदत करते; पण त्याचबरोबर गायकाला सहगायक आणि वादकांशी सुसंवाद साधत सर्वांमधील एकतानता साधण्यासाठी पण मदत करते. अशी एकतानता जेव्हा साधली जाते तेव्हा त्याची अभिव्यक्ती उत्तम कलाकृतीत होते. (संचातील सहगायक आणि वादक मिळून हार्मनी साधतात का मुळात हार्मनी असतेच तेथे सर्वजण मिळून पोचतात?)

अशा हार्मनीतून काय साध्य होते? तर त्या त्या प्रणालीतील घटकांमध्ये एकत्वाची भावना (Feeling of oneness) निर्माण होते. ज्यातून ऐक्य निर्माण होऊ शकते. राष्ट्रीय एकात्मतेसाठी राष्ट्रातील घटकांत म्हणजे राज्यांमध्ये, समाज घटकांमध्ये संवादिता असणे महत्त्वाचे आहे. संकटकाळी, जेव्हा देशावर आक्रमण होते तेव्हा राष्ट्रीय घटकांमध्ये अशी एकतानता (संवाद) निर्माण होते. सर्वांचे प्रयत्न एकाच उद्दिष्टाप्रत परावर्तीत होतात आणि तेव्हा देशप्रेमाची लाट समाज मनात निर्माण होते. नागरिक, समाज गट आणि नागरी व्यवस्था देशाप्रती समर्पण करण्यास उद्युक्त होतात. जेव्हा राष्ट्रीय घटकांमध्ये एकतानतेचा अभाव अर्थात विसंवाद निर्माण होतो तेव्हा देशप्रश्न, समस्या निर्माण होतात.

अशा विसंवादाचे दर्शन जागोजागी होत असते. २००५ च्या ईशान्य भारत मैत्री अभियानातील एक प्रसंग आठवतो. प्रबोधिनीतील एक युवा गट मेघालयातील खासी टेकड्यांमधील पिनुर्सला गावात गेला होता. त्या गावातील तरुण मुलामुलींबरोबरच्या गप्पा रंगात आल्या होत्या. बराचवेळ गप्प असलेली डेलिना मध्येच उसळून म्हणाली, ‘आम्ही शिक्षणासाठी महाराष्ट्रात येऊन राहिलो हे खरं आहे. पण जेव्हा

पुण्यात आलो तेव्हा आम्हाला नेपाळी, चिनी, जपानी म्हटले तेव्हा धक्काच बसला. निसर्गाने आम्हाला वेगळी चेहरेपट्टी दिली म्हणून आम्ही भारतीय नाही का?'

याचा उलटा अनुभव जेव्हा मी मिझोरममध्ये रियाक पीकला गेलो होतो तेव्हा आम्हाला बघून तेथील स्थानिक युवकांनी डखार, डखार अशा हाका मारल्या. डखारचा अर्थ जेव्हा विचारला तेव्हा विदेशी नागरिक असा अर्थ कळला. नागालँडमध्ये गेल्यावर तुम्ही भारतातून आलात का असे विचारले जाते, आपल्याच देशात जेव्हा आपल्याला विदेशी नागरिक म्हणून संबोधले जाते, तेव्हा नागरिका-नागरिकांमधील, राज्या-राज्यांमधील विसंवाद दृश्य होतो. बरेचदा हा विसंवाद एकमेकांप्रतीच्या अज्ञानातून निर्माण झालेला असतो. जेव्हा तिरके प्रश्न विचारून जातीधर्माबद्दल बोलले जाते तेव्हा हा विसंवाद बरेचदा पूर्वग्रहातून निर्माण झालेला असतो. अनेकदा हा विसंवाद एखादी गोष्ट कोणाला उपलब्ध आहे, कोणाला नाही यातून निर्माण झालेला असतो.

व्यक्ती, कुटुंब, समाज आणि राष्ट्रीय प्रणालीतील घटकांमध्ये विसंवाद का निर्माण होतो किंवा त्यांच्यातील एकतानता का हरवते?

अज्ञान आणि पूर्वग्रहांबरोबर एकमेकांच्या अधिक्षेत्रावर केलेले आक्रमण विसंवादास कारणीभूत ठरते. प्रत्येकाला आपल्या मर्यादाक्षेत्राची जाण असली पाहिजे. त्याचे संतुलन प्रत्येक घटकाला साधता आले पाहिजे. त्याचबरोबर जेव्हा एकमेकांत मिसळण्याची वेळ येते तेव्हा दुधात साखर विरघळल्यासारखे एकरूप होता आले पाहिजे. मर्यादा आणि एकरूपता यांचे भान व्यक्तीला, समाजाला आले तर अस्मितांची टक्कर न होता विस्तारित अस्मितांचे समाजमन घडत जाईल. त्यातूनच व्यक्तीचा; समाजाचा प्रवास सहजीवनाकडे सुरू होईल.

राष्ट्रीय एकात्मतेसाठी राष्ट्रीय संवादिता गरजेची आहे. लेखात सुरुवातीला म्हटले तसे संवादिता, एकतानता अर्थात हार्मनी. अशा हार्मनीतूनच विविधतेतून आविष्कारित झालेले राष्ट्र -भारत!! नव्हे एकाच आविष्काराची विविध प्रकटने असलेले राष्ट्र म्हणजे भारत!! असे घडेल तर भारत या शब्दाला अर्थैकत्व प्राप्त होईल.

***

**- प्रशांत दिवेकर**

**पूर्वप्रकाशित ब्लॉगवरून साभार**

prashant.divekar@jnanaprabodhini.org



**विविधतेतील एकता नव्हे, एकात्मतेची विविध रूपे**

भारताच्या दूरदूरच्या भागात प्रवास करताना आपल्याला हा समाज मुळात एक आहे ह्याची जाणीव देणारे धागे सहज लक्षात येत जातात. विविध भागातील आणि परिस्थितीमधील व्यक्तीच्या भौतिक व नैतिक समृद्धीच्या प्रेरणा कुठल्या हे शोधणे हे त्याच जाणिवेतून जमू शकते. तसेच अशा विकासाचा निरुत्साह कुठल्या कुठल्या कारणांमुळे तयार होतो, ह्याचाही शोध त्याच समान जाणिवांतून घेता येतो. प्रत्यक्ष दिसणारी विविधता ही मुळातील एका जीवनदृष्टीची परिस्थितीसापेक्ष होणारी अभिव्यक्ती आहे, हे लक्षात येते.

**– ज्ञान प्रबोधिनी राष्ट्रीय एकात्मता कार्यदिशा भूमिका लेख प्रारूपातून साभार**



ज्ञान प्रबोधिनी प्रशालेचे माजी विद्यार्थी व लष्करातील ज्येष्ठ अधिकारी (निवृत्त) ब्रिगेडियर अभय भट यांचे राष्ट्रीय एकात्मते बद्दलचे विचार समजून घेऊया त्यांच्या संदेशातून...

# Gyansetu Visit to Jammu



**Prathamesh got to know about Gyan-Setu through a friend and said, “Visiting places always gives you an intense understanding of culture and traditions and visiting with Gyan-Setu has given me a wider and mature lookout”. Here is an experience shared by Prathamesh Gujar in an interview conducted by Rahul Wankhede**

Have you ever thought of what it must be to live in a state where every odd day a curfew is announced or a protest takes place? Yes, a state that is often in discussions for negative sides, how it must be to live there? One of our volunteers, Prathamesh Gujar, has been to Jammu and Kashmir not once but twice. He is MA student in political sciences and is preparing for civil services. He also shared how this trip has helped him in preparing for the same. Prathamesh visited Uri in 2018 and Doda in 2019 and when asked to point out differences between the two places he said that Uri being located along LOC is much far from development and being prone to terrorist attacks schools are often shut affecting the studies of children whereas,  situation in Doda is contrasting. Prathamesh also shared that they started

their journey from Jammu to Uri and had to go through many checkpoints with the army patrolling the streets and that worried them a little. But he also told us that the picture that is being put forth by the media is extremely biased and not the entire truth. He said that when they interacted with the driver on their journey it was very obvious that not all people in Jammu and Kashmir are against the army but neither are all for it. Mid way through the talk Rahul asked Prathamesh to share the activities held and how the students responded to all of it. Replying to it he said, “We initially took up some science experiments for the children and we got to know that they are not versed with basics of science. We had to start by explaining them those basics and keeping them on their toes, but even then the students were curious and enthusiastic to learn”. Prathamesh also talked about how they were treated in both the places. He conveyed that in Uri they were not welcomed, “The people there thought we were indulging in with some ulterior motive but when they were sure that there was no such motive they interacted with us nicely”. He also said that people in Doda were very welcoming, “They even offered us traditional kashmiri food which in itself was a gesture”. Commenting on Gyan-Setu’s absence in local politics he said, “Non-political approach is necessary and the way Gyan-Setu works by lightly indulging civil officers is



important". Rahul also asked Prathamesh to share his experience as Group Leader to which he said that he was the Group Leader in 2019 when he visited Doda and he believes that responsibilities start right from attending workshops till you return to Pune. He disclosed that he has learnt the importance of communication, coordination, and taking everyone's opinion into consideration and described how he has learned to balance views and gained amicable confidence. Prathamesh claimed Dr.Sagar Doifode Sir, deputy commissioner of Doda who is also associated with Jnana Prabodhini to be the most memorable person on his trip. Towards the end Prathamesh said that everyone should visit Jammu and Kashmir if they want to experience adventure, scenic beauty, and most importantly should make an eye witnessed opinion about the situation. He expressed his wish to visit again and said that the locals there want only development. They care the



least about if they want to go to Pakistan or continue living in India. They want development and employment. Giving his concluding remark Prathamesh supportively stated that Gyan-Setu Katta and Melava are great initiatives to attract youth and people to visit remote areas and urged new volunteers to visit places and get to know the ground reality.

***

**Articulation by**
**- Shreya Joshi**

**By clicking link attached see video of Prathamesh experience and photos of Jammu visit**

## Listen and Answer

We are sharing a link to a video of **Gyan Setu Katta : Know Our Country Series.** Do watch this video and try to solve a quiz based on it. Let's see how much you know about the mentioned state!

**1. State - Arunachal Pradesh**

Here is an interview of
**Mr. Vijay Swami**
**(Executive Director at RIWATCH)**
on topic "why Arunachal matters for India?"

Quiz Link